108

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# शासकीय आदिवासी आश्रमशाळांचा जलद मुल्यमापन अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११ ००१.

१९९४

# प्रस्तावना

-------

आदिवासी मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यांना शिक्षणाची गोडी लागावी व शिक्षणाचा कोणत्याही प्रकारचा बोजा त्यांच्या पालकांवर पडू नये या उद्देशाने महाराष्ट्रामध्ये आश्रमशाळांची योजना सन 1972 पासून सुरु करण्यात आली व गेल्या 22 वर्षात आश्रमशाळांचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला. सध्या आदिवासी भागात एकूण 602 आश्रमशाळा असून त्यापैकी जवळ जवळ 200 आश्रमशाळा या स्वयंसेवी संस्थामार्फत पण शासनाच्या मदतीने चालविण्यात येत आहेत व 405 आश्रमशाळा शासनाच्या खात्यामार्फत चालू केलेल्या आहेत. या आश्रमशाळांमध्ये मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय होतेच पण त्याशिवाय त्यांच्या राहण्याची, जेवणाची सुध्दा सोय शासनातर्फे मोफत करण्यात येते. आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी खेळ व करमणूकीची साधनेही पुरविली जातात. या आश्रमशाळांच्या कार्यपध्दतीचा जलद मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने सदरचा संशोधन अहवाल तयार करण्यात आलेला आहे. 1991-92 च्या आकडेवारीनुसार आश्रमशाळांमधून शिकलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 1,13,619 असून ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

आदिवासी समाजाची जडण घडण करण्यासाठी आश्रमशाळेचे जलद मूल्यमापन करून त्यामध्ये काही त्रुटी / समस्यांचा अभ्यास करून आणि या योजनाचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कसा घेता येईल यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने हा मूल्यमापन अहवाल हाती घेतला आहे. त्यासाठी 4 आश्रमशाळांची नमुना निवड करण्यात आली. ही नमुना निवड रॅण्डम सॅम्पल सर्व्हे व जलद ग्रामीण माहिती संकलन (आर.आर.ओ.मेथड) या पध्दतीने करण्यात आल्यामुळे आलेले निष्कर्ष सर्वसाधारणपणे कमी अधिक प्रमाणात प्रत्येक आश्रमशाळांना लागू पडण्यास हरकत नसावी.

या संशोधनातून प्रामुख्याने एक गोष्ट दिसून येते ती म्हणजे अशी की, आश्रमशाळातील 10 वीच्या निकालाची आकडेवारी बघितल्यास ती एस.एस.सी.बोर्डाच्या सरासरी निकालापेक्षा तुलनतेत असमाधानकारक नाही. अर्थातच यात सुधारणेस पुष्कळ वावही आहे, यात शंका नाही. त्या सुधारणा कशाप्रकारच्या असाव्यात याबद्दलची सविस्तर चर्चा या अहवालात करण्यात आली आहे.

या अहवालाचे काम श्रीमती उज्वला थोरात, वरिष्ठ सांख्यिकी सहायक यांचेकडे सोपविण्यात आले होते. त्यासाठी लागणारी माहिती संकलन, तिचे पृथःकरणाचे कामास सौ.एम.डी.घोडे, संशोधन अधिकारी यांनी त्यांना मार्गदर्शन केले व संस्थेतील इतर अधिका-यांनी योग्य त्या सूचना

दिल्या. या अहवालातील निष्कर्ष व शिफारशी आदिवासी विभागात काम करणा-या कार्यकर्त्यांना, शासकीय अधिका-यांना, मुख्याध्यापकांना व कर्मचा-यांना उपयुक्त ठरतील अशी आशा वाटते. काही धोरणात्मक निर्णय नव्याने घ्यावे लागतील. तसेच काही बदल करणेही आवश्यक असल्याचे दिसून येते. यादृष्टीने हा अहवाल आदिवासी विकास विभाग व शासनास उपयुक्त ठरेल, अशी खात्री वाटते.

पुणे

दिनांक- १६।७।९४


(डॉ. नवीनचंद्र जैन)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे 1

## अ नु क्र मा णि का


| अ.नं. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | प्रास्ताविक | 1 |
| 2. | संशोधनाची उदिष्ट्ये | 4 |
| 3. | संशोधन पध्दती | 5 |
| 4. | पाहणी व निष्कर्ष | 6 |
| 5. | निष्कर्ष | 12 |
| 6. | उपाययोजना | 14 |

# प्रास्ताविक

--------

1·1 स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शासनाने वर्षानुवर्षे दारिद्र्यात, अज्ञानात खितपत पडलेल्या आदिवासी नागरिकांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी अनेकविध योजना सुरु केल्या· या योजनांची आखणी करतांना आदिवासींना साक्षर बनवून त्यांना आजूबाजूच्या घडामोडीबद्दल, बदलांबद्दल जागरूक बनवावे व स्वतःचा विकास घडवून आणण्यास प्रवृत्त करावे यादृष्टीने आदिवासी विकासात "शिक्षण" किंवा "शैक्षणिक विकास" हा घटक केंद्रभूत केला गेला या दृष्टीकोनातून आदिवासी मुलांसाठी शासकीय आश्रमशाळा समूह ही योजना महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील आदिवासी विकास संचालनालयाने 1972-73 पासून राबविण्यास सुरवात केली·

1·2 आश्रमशाळा योजनेचा मुख्य उद्देश होता आदिवासी मुलांना शिक्षण व आवश्यक त्या शैक्षणिक सुविधा देणे· आदिवासी मुलांना शिक्षण घेण्यात ज्या अडचणी येतात, त्यातील प्रमुख अडचण म्हणजे या मुलांना पोटासाठी रोजच्या चरितार्थासाठी दिवसभर उन्हातान्हात, जंगलात, शेतात राबावे लागते· जोपर्यंत पोटाची भूक भागणार नाही तोपर्यंत त्यांना कुठलेही काम सुचणार नाही· मग शिक्षण तर फार दूरची गोष्ट ठरते· आदिवासी कुटुंबात रोजचे दरडोई उत्पन्न इतके तुटपुंजे असते की उदरनिर्वाहासाठी कुटुंबाला हातभार लावण्यासाठी आदिवासी मुलांना मिळेल तेथे रोजंदारीवर काम करावे लागते किंवा घरच्या कामात वाटा उचलावा लागतो· आदिवासी मूल हे याप्रमाणे कुटुंबातील "आर्थिक घटक" ठरत असते· त्यामुळे या मुलांना आर्थिकदृष्ट्या खर्च करुन शाळेत पाठवून त्यांच्या रोजच्या उत्पन्नावर अथवा मदतीवर पाणी सोडण्यापेक्षा या मुलांना घरी बसविणे आदिवासी पालकांना जास्त संयुक्तिक वाटते· ही बाब लक्षात घेऊन आदिवासी मुलांच्या प्राथमिक मूलभूत गरजा { उदा·अन्न,वस्त्र, निवारा} भागवून नंतर त्यांना शिक्षण घेण्यास उद्युक्त करावे या दृष्टीकोनातून आश्रमशाळांची रचना करण्यात आली· केवळ शिक्षणच नव्हे तर आदिवासी मुलांचे राहणे, कपडे, जेवण, शैक्षणिक सुविधा व इतर आवश्यक खर्चाची जबाबदारी आश्रमशाळा योजनेमार्फत राज्य व केंद्र शासनाने उचलली व आदिवासी मुलांच्या चिंता, विवंचना दूर करुन त्यांच्यापुढे "शिक्षण" हे एकच मुख्य ध्येय ठेवण्यात आले·

आश्रमशाळा समूह ह्या मूळ योजनेच्या मागे केवळ पुस्तकी शिक्षण देणे हा एकमेव हेतू सुरवातीस नव्हता· तर या निमित्ताने एक विकास केंद्र तयार करुन आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या हेतूने या शाळेतच कालांतराने-

1• कृषी प्रात्यक्षिक केंद्र
2• पशुसंवर्धन केंद्र
3• आरोग्य केंद्र
4• व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र

स्थापन करुन गरजेनुसार शाळेतील विद्यार्थ्यांना व परिसरातील आदिवासींना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची, पशुसंवर्धन प्रक्रियांची, आरोग्यविषयक व व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देऊन सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध करुन देण्याची कल्पना होती•

कालांतराने अनेक अडचणींमुळे उपरोक्त 4 उपक्रम सुरु केले जाऊ शकले नाहीत व एकमेव पुस्तकी शिक्षणाचा भाग कायम राहिला•

1•3 कुठल्याही आदिवासी जमातीतील मूल पाच ते सहा वर्षाचे झाले की, त्याला बालवडीत घातल्यानंतर निदान तो दहावीपर्यंत शिक्षण घेऊनच बाहेर पडेल अशा पध्दतीने आश्रमशाळांची योजना आखण्यात आली• शाळेसाठी स्वतंत्र इमारत, (त्यापासून काही अंतरावर परंतू) त्याच परिसरात विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह व जवळच थोडया अंतरावर शिक्षकांसाठी स्वतंत्र निवासस्थाने अशा पध्दतीची रचना या योजनेत करण्यात आली, जेणेकरुन शाळेव्यतिरिक्तच्या वेळातही या विद्यार्थ्यांच्या आहारावर, अभ्यासावर, वैयक्तिक कलागुणांवर शिक्षकांचे लक्ष राहील• तसेच शिक्षकांचा सतत सहवास लाभून या विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास आपोआपच घडून येईल• हा उद्देश ठेवून 1972-73 या वर्षात महाराष्ट्र शासनाने 31 आश्रमशाळा सुरु केल्या व 20 वर्षांच्या कालावधीत 1992-93 या वर्षी त्यांची संख्या 405 वर जाऊन ठेपली• शासनाकडून अनुदाने मिळवून काही स्वयंसेवी संस्थांनी सुरु केलेल्या आश्रमशाळांची नोंद घेतली तर ही संख्या 602 अशी होते• सन 1991-92 मध्ये फक्त शासकीय आश्रमशाळांमध्ये शिकणा-या आदिवासी विद्यार्थ्यांची आकडेवारी पाहिली तर आश्रमशाळा योजनेचा लाभ बहुसंख्य विद्यार्थी घेतात• यातून या कामाचा विस्तार आपल्या लक्षात येईल• तक्ता क्र•1•1 मध्ये ही आकडेवारी दिली आहे•

तक्ता क•1•1

## शासकीय आश्रमशाळेतील इयत्तानिहाय विद्यार्थ्यांची संख्या

(सन 1991-92)

| अ•क्र• | इयत्ता | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1• | बालवाडी | 4,324 | 4,310 | 8,634 |
| 2• | इ•1 ली | 10,087 | 6,049 | 16,136 |
| 3• | इ•2 री | 9,238 | 5,449 | 14,687 |
| 4• | इ•3 री | 9,140 | 5,405 | 14,545 |
| 5• | इ•4 थी | 7,529 | 4,311 | 11,840 |
| 6• | इ•5 वी | 8,519 | 4,544 | 13,063 |
| 7• | इ•6 वी | 7,247 | 3,573 | 10,820 |
| 8• | इ•7 वी | 6,891 | 2,983 | 9,874 |
| 9• | इ•8 वी | 4,308 | 1,472 | 5,780 |
| 10• | इ•9 वी | 3,610 | 1,101 | 4,711 |
| 11• | इ•10 वी | 2,809 | 720 | 3,529 |
| | एकूण | 73,702 | 39,917 | 1,13,619 |

1•4 हया आश्रमशाळांच्या कामकाजाची पाहणी करून सद्यस्थितीत त्यांच्यात काही दोष/त्रुटी आढळत असल्यास त्या दूर करून या आश्रमशाळांचा लाभ जास्तीत जास्त आदिवासी मुलांना कसा घेता येईल याचा मूल्यामापनात्मक अभ्यास करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या संस्थेकडून हा अहवाल तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या सूचनेवरून 17 फेब्रुवारी, 1993 रोजी घेण्यात आला•

## संशोधनाची उदिष्टये

2·1 ह्या मूल्यमापनात्मक संशोधन अहवालाचा उद्देश शासकीय आश्रमशाळांच्या सद्यस्थितीतील कामकाजाची पाहणी करणे हा होता. केंद्र व राज्य शासनाने आदिवासींचा विकास घडवून आणण्यासाठी अनेकविध योजना अंमलात आणल्या आहेत. त्यापैकी शैक्षणिक क्षेत्रातील "आश्रमशाळा" ही योजना अत्यंत उपयुक्त ठरल्यामुळे या योजनेची पुन्हा एकदा धावती पाहणी करून शैक्षणिक दृष्टीकोनातून या योजनेचा किती उपयोग करून घेतला जातो हे अभ्यासणे हे या संशाधनाचे मूळ उदिष्टय होते. या अहवालाची उदिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. शासकीय आश्रमशाळांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे
2. शैक्षणिक दृष्टीकोनातून शासकीय आश्रमशाळा आदिवासी मुलांना सुशिक्षित बनविण्यात खरोखर किती हातभार लावतात हे अभ्यासणे.
3. शासकीय आश्रमशाळांच्या व्यवस्थापनाची पाहणी करणे.
4. शासकीय आश्रमशाळातील आदिवासी मुलांची प्रवेशसंख्या व प्रत्यक्ष उपस्थिती अभ्यासणे.
5. आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांशिवाय आरोग्य व कीडा यासारख्या इतर सुविधा मिळतात का याची पाहणी करणे.
6. या आश्रमशाळा चालविताना येणा-या व्यवस्थापकीय अडचणींचा अभ्यास करणे.
7. या आश्रमशाळांतील मुलांची निकालाची टक्केवारी अभ्यासणे

# संशोधन पध्दती

-----------

तक्ता क्र•3•1

संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या आश्रमशाळा दर्शविणारा तक्ता••

| अ•क्र• | जिल्हा | तालुका | शाळा | ठिकाण | बेसिक/पोस्टबेसिक |
|---|---|---|---|---|---|
| 1• | नाशिक | दिंडोरी | निगडोळ | दुर्गम | बेसिक |
| 2• | नाशिक | दिंडोरी | ढेपणपाडा | दुर्गम | पोस्टबेसिक |
| 3• | यवतमाळ | पांढरकवडा | जांब | दुर्गम | पोस्टबेसिक |
| 4• | अमरावती | धारणी | बिजूधावडी | दुर्गम | बेसिक |

3•1 हा संशोधन अहवाल " Quick Evaluation Report " असल्यामुळे या संशोधनासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नाशिक, यवतमाळ, अमरावती अशा चार जिल्हयांतील चार आश्रमशाळा निवडण्यात आल्या• तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी गोंडवन व सहयाद्री विभागाची निवड करण्यात आली•

3•2 तसेच हा अहवाल कमी वेळात सादर करावयाचा असल्यामुळे व फक्त चार आश्रमशाळा निवडलेल्या असल्यामुळे आर•आर•ए• (Rapid Rural Appraisal) ही संशोधन पध्दती वापरण्यात आली• आर•आर•ए•संशोधनपध्दतीत प्रश्नावली किंवा प्रपत्रे भरून माहिती गोळा करण्यापेक्षा लोकांमध्ये मिसळून प्रत्यक्ष निरीक्षण व अनौपचारिक गप्पांतून गोळा करून निष्कर्ष काढण्यावर भर दिला जातो• त्याप्रमाणे या संशोधनासाठी फक्त मुख्याध्यापकांची एक संरचित प्रश्नावली तयार करण्यात आली व ती अन्वेषकांकडून प्रत्यक्ष भेटीत भरून घेण्यात आली• याशिवाय आश्रमशाळांतील शिक्षक, इतर कर्मचारी व विद्यार्थ्यांशी अनौपचारिक गप्पांतून आश्रमशाळेविषयी आवश्यक माहिती मिळविण्यात आली•

3•3 मुख्याध्यापकांसाठी तयार करण्यात आलेली प्रश्नावली अहवालाच्या शेवटी सादर केली आहे•

## पाहणी व निष्कर्ष

4.1 मुख्याध्यापकांच्या प्रपत्रातून मिळालेली सांख्यिकी माहिती व प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे प्राप्त झालेली माहिती तक्त्यांच्या आधारे पुढे विशद केली आहे. नमुना आश्रमशाळांतील जमातीवार विद्यार्थी प्रवेश तक्ता

तक्ता क्र. 4.1

| अ.क्र. | आश्रमशाळा | जमातीवार विद्यार्थीसंख्या | | इतर विद्यार्थी | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | निगडोळ | 1.कोकणा | 190 | 19 | 337 |
| | | 2.महादेव कोळी | 128 | | |
| 2. | ठेपणपाडा | 1.कोकणा | उ.ना. | -- | 448 |
| | | 2.महादेव कोळी | उ.ना. | | |
| 3. | जांब | 1. गोंड | 236 | 66 | 521 |
| | | 2. परधान | 125 | | |
| | | 3. कोलाम | 76 | | |
| | | 4. गोंडगवारी | 05 | | |
| | | 5. आंध | 08 | | |
| | | 6. धनवर | 05 | | |
| 4. | धावडीधजू | 1. कोरकू | 353 | 2 | 383 |
| | | 2. गोंड | 23 | | |
| | | 3. आंध | 1 | | |
| | | 4. गवलाण | 4 | | |

4.2 शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिकणा-या आदिवासी मुलांचे प्रमाण किती असते? किंवा शासकीय आश्रमशाळांमधून खरोखरच आदिवासी मुले शिकतात का ? या प्रश्नांना तक्ता 4.1 मधून उत्तर मिळेल. नमुना पाहणीतील अचानक भेटी दिलेल्या आश्रमशाळांमध्ये जवळजवळ 95 टक्के विद्यार्थी हे आदिवासी आढळले.

उरलेली 5 टक्के विद्यार्थी संख्या ही मागासवर्गीय दारिद्र रेषेखालील गटातील तसेच आश्रमशाळेतील शिक्षक व इतर कर्मचारी वर्गाच्या मुलांपैकी काही अशी असल्याचे आढळले. म्हणजेच आश्रमशाळा योजनेचा लाभ घेणारी 95 टक्के विद्यार्थी संख्या आदिवासी मुलांची आहे यावरुन ( या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा) या योजनेमागील मुख्य हेतू साध्य होतो आहे असे म्हणावयास हरकत नाही.

नमुना आश्रमशाळेतील विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षित शिक्षकांची माहिती दर्शविणारा तक्ता.

तक्ता क्र.4.2.

| अ.क्र. | आश्रमशाळा | जिल्हा | तालुका | प्रकार | विद्यार्थी संख्या | शिक्षक संख्या | प्रशिक्षित शिक्षक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | निगडोळ | नाशिक | दिंडोरी | पोस्टबेसिक | 337 | 12 | 9 |
| 2. | ढेपणपाडा | नाशिक | दिंडोरी | पोस्टबेसिक | 448 | 15 | 12 |
| 3. | जांब | यवतमाळ | घाटंजी | पोस्टबेसिक | 521 | 15 | 15 |
| 4. | धावडीबिजू | अमरावती | धारणी | पोस्टबेसिक | 383 | 15 | 14 |

4.3 तक्ता क्र.4.2 चा अभ्यास केला असता नाशिक, यवतमाळ व अमरावती जिल्ह्यांतील आश्रमशाळा योजनेतून शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचे सर्वसाधारण प्रमाण कळते. आश्रमशाळा योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता या योजनेची उपयुक्तता व आवश्यकता लक्षात येते. या आश्रमशाळांतील शिक्षक संख्या व विद्यार्थी संख्या यांची सांगड घातली असता जास्तीत जास्त विद्यार्थी शाळेत आहेत असे गृहित धरले तरी 35×15=525 या हिशोबाने साधारणतः 35 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक आहे, असे आढळूनआले. आदिवासी विद्यार्थ्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी व मानसिक स्थिती ही सर्वसाधारण विद्यार्थ्यांपेक्षा मागासलेली, अविकसित असते, ही बाब मान्य केल्यावरही एक शिक्षक पस्तीस विद्यार्थ्यांवर निश्चितच वैयक्तिक लक्ष केंद्रीत करु शकतो. आश्रमशाळेत काम करणा-या एकूण शिक्षकांपैकी 90 टक्के शिक्षक प्रशिक्षित असल्याचे उपरोक्त तक्त्यावरुन निर्देशित होते. थोडक्यात आश्रमशाळेत शिक्षण घेणारी आदिवासी विद्यार्थी संख्या वर्गवार शिक्षक आणि प्रशिक्षित शिक्षकांची संख्या समाधानकारक आढळते.

नमुना निवडीतील आश्रमशाळांमधील गळतीचे प्रमाण

तक्ता क्र• 4•3

| अ•क्र | आश्रमशाळा नांव | विभाग | प्राथमिक विभाग टक्केवारी | माध्यमिक विभाग टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1• | निगडोळ | सह्याद्री | 7•80 | -- |
| 2• | ठेपणपाडा | --"-- | 10•00 | 19•00 |
| 3• | जांब | गोंडवन | 15•00 | 5•00 |
| 4• | धावडी बिजू | --"-- | 25•00 | 20•00 |

4•4 शासकीय आश्रमशाळेतील गळतीचे प्रमाण ही एक चिंतेची बाब आहे• मुलांवर पाठयक्रमिक अभ्यासाचे येणारे दडपण, अभ्यासाविषयी वाटणारी अरुची, आश्रमशाळेतील कंटाळवाणे नीरस वातावरण, शिक्षकांची उदासिनता आणि घराबद्दल वाढणारी ओढ व आर्थिक समस्या या सर्वांची परिणिती मुलांचे शाळेमधील लक्ष उडण्यात होते व परिणामतः ही मुले शालेय शिक्षणावर पाणी सोडून घरी बसणे पसंत करतात• शासकीय आश्रमशाळेतील गळतीचे प्रमाण शाळावर तसेच इयत्तावार वेगवेगळे आहे• पण त्यातही प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण जास्त आढळते• सह्याद्री विभागात प्राथमिक व माध्यमिक विभागात 7•80 टक्केपासून ते 20 टक्क्यापर्यंत मुलांचे गळतीचे प्रमाण आढळते• गोंडवन विभागात सह्याद्री विभागाशी तुलना करता गळतीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते• गोंडवन विभागातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील वर्गामध्ये गळतीचे प्रमाण 15 टक्केपासून 25 टक्क्यापर्यंत आढळले• प्राथमिक विभागातील वर्गामध्ये प्रवेश घेणारी मुले ही 6 ते 7 वर्षाची आणि लहान वयात घरापासून प्रथमतःच दूर ठेवली गेलेली अशी असतात• या मुलांना शाळेत प्रेम व आपुलकी मिळाली नाही• त्यांच्या मनात जाणीवपूर्वक शाळेबद्दलची ओढ व रुची निर्माण केली नाही तर साहजिकच शाळेत राहून शिक्षण घेणे हे त्यांना कष्टप्रद शिक्षेसमान होते• या वयात शिक्षणाचे महत्वही समजत नसल्यामुळे त्यांनी त्यादृष्टीने पुढचा विचार करून शाळेत राहावे ही अपेक्षा करणेही चूक आहे• माध्यमिक विभागातील वर्गामधील मुले ही जाणत्या वयाची असतात• शिक्षणामुळे मिळणारे फायदे ते लक्षात घेऊ शकतात• तसेच या वयात समवयस्क मित्रांची ओढ वाटत असल्यामुळे व शिक्षकांशी ही औपचारिक/अनौपचारिक नातेसंबंध निर्माण करण्याची

क्षमता आली असल्यामुळे या वयातील मुले आश्रमशाळेतील वातावरणाशी समायोजन करून घेऊ शकतात. त्यामुळेच माध्यमिक विभागातील वर्गामधील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी आढळून येते.

या पाहणीमध्ये ज्या आश्रमशाळांमधील गळतीचे प्रमाण कमी आढळले त्या आश्रमशाळेत उत्कृष्ट शालेय वातावरण निर्माण करण्यात आले होते. शाळेतील शिक्षक पालकांप्रमाणे मुलांच्या अडीअडचणींशी सुखदुःखांशी समरस होत होते. पाठयक्रमिक अभ्यासाव्यतिरिक्त या मुलांच्या अंगातील सुप्त कलागुण ओळखून त्यांना खतपाणी घालून त्यांची जोपासना करताना दिसले. साहजिकच मुलांना अशा आश्रमशाळेबद्दल शिक्षकांबद्दल ओढ वाटू लागली व गळतीचे प्रमाणही कमी झाले. आश्रमशाळेतील वातावरण व शिक्षकांची उदासिनवृत्ती दूर झाल्यास गळतीचे प्रमाण काही अंशी कमी होण्यास नक्कीच हातभार लागू शकेल.

4.5 शासकीय आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांच्या निकालाची टक्केवारी पाहिली असता इ.1 ली ते नववीपर्यंत निकालाची टक्केवारी 70 टक्के ते 85 टक्के असल्याचे आढळले. पण माध्यमिक शालांत आयोगाकडून घेतल्या जाणा-या इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांची संख्या 45 ते 65 टक्केच्या आसपास असल्याचे मुख्याध्यापकांनी मत दिले आहे. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी माध्यमिक शालांत परीक्षमध्ये अनुत्तीर्ण का होतो ? दहावीच्या निकालाची टक्केवारी इतर वर्गाशी तुलना करता का घसरते ? या प्रश्नांचे उत्तर शोधण्याकरिता आश्रमशाळांतील विद्यार्थी व शिक्षकवर्ग यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली असता त्यांच्याकडून पुढीलप्रमाणे उत्तरे मिळाली.

1. इयत्ता नववीपर्यंतच्या परीक्षा शाळा घेत असतात.
2. इ.दहावीची परीक्षा माध्यमिक शालांत आयोगामार्फत घेतली जाते. या परीक्षेबद्दल आदिवासी विद्यार्थ्यांच्या मनात भिती व दडपण असते.
3. विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन कमी पडते.
4. प्रश्नांचा रोख लक्षात येत नाही. काही वेळेस भाषा समजत नाही.
5. भरपूर अभ्यास व वाचन केले तरी त्याचे रूपांतर उत्तरात कसे करायचे हे समजत नाही.
6. इंग्रजी, गणित व शास्त्र विषयांचे शास्त्रशुध्द आकलन होत नाही. या विषयांचा पाया बळकट करून घेतला जात नाही.

उपरोक्त उत्तरावरून शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण का होतात याची कारणमिमांसा लक्षात येते.

## नमुना निवडीतील आश्रमशाळांची सद्यस्थिती

तक्ता क्र·4·4

| अ·क्र· | आश्रमशाळा | इमारतीचे स्वरुप | पाणीपुरवठा | वीजपुरवठा | स्वच्छतागृहे वापर |
|---|---|---|---|---|---|
| 1· | निगडोळ | पक्की/शासकीय मालकीची | पुरेसा | आहे | होतो |
| 2· | ठेपणपाडा | शासकीय मालकीची {परंतू 91 साली पडली} | अपूरा | आहे | नाही |
| 3· | जांब | पक्की शासकीय मालकीची | अपूरा | आहे | नाही |
| 4· | धावडीबिजू | --"-- | अपूरा | आहे | नाही |

4·6 उपरोक्त तक्त्यावरुन असे निर्देशित होते की, शासकीय आदिवासी आश्रमशाळांना स्वतःच्या मालकीची पक्क्या स्वरुपातील इमारती आहेत· तसेच दुर्गम भागातील आश्रमशाळांनाही विद्युतपुरवठा करण्यात आला आहे· हा निष्कर्ष कदाचित संपूर्ण आश्रमशाळांच्या पाहणीत चुकीचा ठरु शकतो· सद्यस्थितीत काही लक्षणीय अपवाद वगळता उर्वरित शासकीय आश्रमशाळांना भेडसवणारी प्रमुख समस्या आहे पाणीटंचाई· केवळ पिण्याचेच नव्हे तर रोजच्या वापरासही पाणीपुरवठा अत्यल्प असल्यामुळे आंघोळ, कपडे धुणे यासारख्या आवश्यक दैंनदिन बाबीत चालढकल केली जात असल्याचे आढळले· स्वयंपाकघरात अस्वच्छता आढळली· एवढेच नव्हें तर तक्ता क्र·4·3 मधील सर्व आश्रमशाळांना स्वच्छतागृहाची सुविधा बांधून दिलेली असतानाही केवळ पाण्याच्या अभावामुळे त्यांचा वापर होत नसल्याचे निदर्शनास आले·

नमुना निवडीतील आश्रमशाळांची सद्य:स्थिती

तक्ता क्र•4•5

| अ•क्र• | आश्रमशाळा | जिल्हा | शाळेत उपलब्ध असणारी औषधे | क्रीडा सुविधा | अन्य सांस्कृतिक सुविधा/कार्यक्रम |
|---|---|---|---|---|---|
| 1• | निगडोळ | नाशिक | पुरेशा | आहेत | विविध सांस्कृतिक कार्यक्रम होतात• |
| 2• | ठेपणपाडा | नाशिक | अपूरी | मैदानी खेळ फक्त | नाही |
| 3• | जांब | यवतमाळ | अपूरी | ---"--- | काही मर्यादित |
| 4• | धावडीबिजू | अमरावती | अपूरी | नाही | नाही |

4•7 उपरोक्त तक्त्यावरून असे लक्षात येते की, दैनंदिन आवश्यक बाबी व शैक्षणिक सोयी सुविधांखेरीज इतर घटकांकडे पाहिले असता आश्रमशाळांना मिळणा-या वैद्यकिय सुविधा अपू-या आहेत• तसेच सर्व आश्रमशाळांपैकी निगडोळ या आश्रमशाळेचा अपवाद वगळता इतर शाळांमध्ये क्रीडा नैपुण्य किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवावे म्हणून शिक्षकवर्ग विशेष कष्ट घेताना आढळला नाही

4•8 **व्यवस्थापकीय समस्या आणि त्रुटी :-**

आश्रमशाळेच्या व्यवस्थापनाची/प्रशासनाची पाहणी करीत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की हे प्रशासन शिक्षकीपेशाचे प्रशिक्षण घेऊन आलेल्या शिक्षकांकडे सोपविलेले आहे• आश्रमशाळेचे मुख्याध्यापक आणि अधीक्षक हे जरी तज्ञ शिक्षक असले तरी व्यवस्थापनाचा अनुभव त्यांना असतोच असे नाही• आश्रमशाळांमध्ये 300 ते 450 पर्यंत निवासी विद्यार्थी राहतात, असे गृहित धरले तरी एवढ्या मुलांचा आहार, आरोग्य, त्यांची दैनंदिनी, शाळेला पुरविलेल्या वस्तुंचे रजिस्टर मग त्या शालेय असतील किंवा आजाराशी निगडीत असतील, त्याचे योग्य

प्रमाणात वाटप आणि वस्तुंचा ताळेबंद, जमाखर्च ठेवणे इ. व यासारख्या अन्य बाबतीत हे शिक्षक उणे पडतात. परिणामतः §1§ आश्रमशाळेच्या दैनंदिनीमध्ये विस्कळीतपणा जाणवतो §2§ या विद्यार्थ्यांसाठी एकतर एवढा स्वयंपाक केला जातो की, मुलांना नंतर शिळे अन्न खावे लागेल अथवा फेकून द्यावे लागेल किंवा मग स्वयपाक कमी पडल्यामुळे आहे त्यात भागवून समाधान मानावे लागेल. §3§ रजिस्टर, जमाखर्च व वस्तुंचा ताळेबंद दर्शविणारे हिशोब ठेवले जात नाही अथवा त्यात त्रुटी आढळतात. §4§ शाळेचा परिसर स्वच्छ, आरोग्यदायी राखला जात नाही. या व यासारख्या त्रुटी दूर करण्यासाठी मुख्याध्यापक व अधीक्षकांना व्यवस्थापकीय/प्रशासकीय प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

आश्रमशाळांच्या मुख्याध्यापक व अधीक्षकांना जाणवणा-या प्रशासकीय समस्यांबाबत चर्चा केली असता असे लक्षात आले की, आदिवासी विकास महामंडळ आश्रमशाळांना वस्तुपुरवठा करीत असते. या वस्तुंचा दर्जा कित्येकवेळा समाधानकारक नसतो. तसेच कित्येकदा मागणी केलेल्या वस्तुऐवजी महामंडळ त्यांच्याकडे शिल्लक असलेला पर्यायी माल पाठविते. उदा. महामंडळाकडे गव्हाची मागणी केली असता महामंडळाकडून गहू शिल्लक नसल्यास तांदूळ जास्त प्रमाणात पाठविण्यात येतो. अशावेळी आलेला माल स्विकारुन वेळ साजरी करण्याशिवाय पर्याय नसतो. तसेच विद्यार्थी आजारी पडल्यास त्याला प्राथमिक मदत म्हणून देण्यासारखी जुजबी चांगली औषधे या शाळांना उपलब्ध करुन दिली जात नाही. या शाळांच्या "फर्स्ट एड बॉक्स" पाहिल्या असता त्यात कित्येक औषधांचा अभाव जाणवला. तसेच शाळेच्या इमारतीमध्ये किरकोळ पडझड होणे, पावसाळयात पत्रे गळणे यासारख्या बाबी जेव्हा उद्‌भवतात, तेव्हा त्याची दुरुस्ती करण्याबाबत प्रकल्प अधिका-यांना विनंती अर्ज करीत बसावे लागते. आश्रमशाळांच्या प्रयोगशाळांसाठी, ग्रंथालयासाठी त्यांची अत्यावश्यकता लक्षात येऊनही त्यांची मागणी नोंदविल्याशिवाय मुख्याध्यापक काही कार्यवाही करु शकत नाही. यासारख्या समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

## 4.9 निष्कर्ष :-

ह्या मूल्यमापनात्मक अहवालाच्या निष्कर्षांना सुरवात करण्याआधी एक बाब प्रकर्षाने नमूद केली पाहिजे ती अशी की हा जलद मूल्यमापनात्मक अहवाल असल्यामुळे या अहवालासाठी राज्यातील एकूण 405 आश्रमशाळांपैकी फक्त चार आश्रमशाळांच्या पाहणीवरुन हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे या अहवालातील पाहणी व निष्कर्ष राज्यातील सर्व आश्रमशाळांना लागू पडतीलच असे नाही.

1• तक्ता क्र•1•1 व 4•1• व 4•2 चा अभ्यास केला असता 1,13,619 आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा पुरविणारी आश्रमशाळा योजना ही अत्यंत उपयुक्त व आवश्यक अशी योजना आहे• बहुसंख्य आदिवासी विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळत असल्यामुळेच शिक्षण घेऊ शकत आहेत, हे निर्विवादपणे नमूद करणे क्रमप्राप्त आहे•

2• नमुना पाहणीतील आश्रमशाळांची पाहणी केली असता एक बाब अशी लक्षात आली की, §1§ लोकजीवनापासून दूर राहावे लागत असल्यामुळे §2§ पाणी टंचाई, दवाखान्याची सुविधा नाही, बाजारपेठ नाही §3§ शैक्षणिक साहित्यांची कमतरता या व यासारख्या इतर अनेक कारणांचा परिणाम आश्रमशाळांतील शिक्षकवर्ग उदासिन बनण्यात झालेला आहे• या आश्रमशाळांमध्ये शासकीय सोयी सुविधा व प्रशिक्षित शिक्षक असतानाही शैक्षणिक वातावरण आढळले नाही• बुजरे जास्त आत्मविश्वास नसलेले विद्यार्थी व उदासिन शिक्षकवर्ग यामुळे आश्रमशाळा सर्वसाधारण इतर शैक्षणिक संस्थांप्रमाणे विद्यादान/ज्ञानार्जन या बाबीवर मनापासून कष्ट घेत नसल्याचे जाणवले• केवळ शिक्षकांच्या उदासिनवृत्तीमुळे हे होते• कारण नमुना पाहणीतील नाशिक जिल्हयातील फक्त निगडोळ येथील आश्रमशाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग विद्यार्थ्यांच्या केवळ अभ्यासातच नव्हे तर क्रीडानैपुण्य, सांस्कृतिक विकासातही रस घेत असल्यामुळे अपेक्षापेक्षाही आदर्श चैतन्यदायी आश्रमशाळेचे दर्शन घडले• या शाळेतील विद्यार्थी अभ्यासात पुढे आहेतच• शिवाय नृत्यदर्शन, गायन, निबंध, चित्रकला स्पर्धा,मैदानी खेळ, मेरथॉन, पोहणे, नेमबाजी यासारख्या गोष्टीतही प्रविण असल्याचे आढळले•

3• नमुना पाहणीतील आश्रमशाळांना पाणीटंचाईची तीव्र समस्या भेडसावते आहे, पाणीटंचाईमुळे विद्यार्थ्यांना आंघोळ, कपडे धुणे करता येत नाही तसेच इतर स्वच्छतागृहे असून वापरता येत नाहीत• त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या राहण्यात अस्वच्छपणा जाणवतोच • शिवाय त्यांना संसर्गजन्य त्वचारोग व इतर आजारही होत असतात• तसेच आजार बळावल्यास आश्रमशाळेत औषधपचाराची सोय नसल्यामुळे त्यांना शिक्षण सोडून घरी बसावे लागते• त्यामुळे पाणीटंचाईसारखी समस्या तातडीने दूर करणे आवश्यक आहे•

4• आश्रमशाळा योजनांची अंमलबजावणी करताना § क्र•4•8 पाहणी व निष्कर्ष§ नमूद केल्याप्रमाणे इतर अनेक प्रशासकीय समस्या वेळोवेळी उद्‌भवत असतात• तरीसुध्दा बहुसंख्य आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी सद्यःस्थितीत तरी पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे प्रसंगी झीज सोसून वेळोवेळी समस्यांचे निराकरण करुन आश्रमशाळा योजना राबविणे व आहे त्यापेक्षा कार्यक्षम करणे आवश्यक ठरते•

4·10 **उपाययोजना :-**

सूचना :-

1· या पाहणीमध्ये असे आढळले की आदिवासी पाडयाप्रमाणेच आश्रमशाळाही अतिशय दुर्गम भागात आहेत· दळणवळणाच्या साधनांचा अभाव, दवाखाने लांब, बाजारपेठा लांब, मुख्य म्हणजे जनसंपर्कापासून अतिशय दुरावलेल्या अशा आहेत· त्यामुळे शिक्षकांना आश्रमशाळांत राहणे ही शिक्षाच वाटते· हे टाळण्यासाठी येथून पुढे साधारणतः आदिवासी विभागात जिथे आठवडयाचा अथवा मासिक बाजार भरतो अशा ठिकाणी आश्रमशाळा बांधाव्या· ज्यायोगे शिक्षक, विद्यार्थी व जनजीवनाचा संपर्क पूर्णतः तुटणार नाही·

2· आश्रमशाळेत शिकविणा-या शिक्षकांना विशेषभत्ता, उत्तेजनार्थ विशेष मोबदला दिला जावा· तसेच जिल्हावार आश्रमशाळांतून आदर्श शिक्षक, आदर्श आश्रमशाळा निवडून त्याना शिक्षकदिन/स्वातंत्रदिन अशा प्रसंगी उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जावी·

3· शाळांच्या शैक्षणिक तपासणीचे काम पाहण्यासाठी प्रकल्प अधिकारी कार्यालय येथे वर्ग-2 चे पातळीवरील शैक्षणिक तपासणी अधिका-याचे पद निर्माण करण्यात यावे व त्यावर प्रशिक्षित अधिका-यांची नेमणूक करण्यात यावी·

4· आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय पथकांनी तीन महिन्यातून कमीत कमी एकदा संबंधित आश्रमशाळांना भेटी देऊन मुलांची वैद्यकिय तपासणी करावी व मुख्याध्यापकांमार्फत प्रकल्प अधिका-यांना अहवाल सादर करावा·

5· प्रकल्प अधिका-यांच्या स्तरावरुन वर्षातून कमीत कमी एकदा प्रशासन, शैक्षणिक बाबी तसेच आर्थिक व्यवहाराची सविस्तर तपासणी सहा·प्रकल्प अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व लेखा तपासणी यांचे पथकाद्वारे करण्यात यावी·

6· सर्व आश्रमशाळांना पाण्याची तीव्र टंचाई भासते· यासाठी शाळेच्या परिसरात पाणी लागत असल्यास बोअरवेलची (विहिरी खणून पाण्याची) व्यवस्था करावी· अथवा त्या परिसरातील नदीच्या पात्रात विहिर खणून तेथून आश्रमशाळांपर्यंत पाईपलाईन टाकून पाणी आणण्याची व्यवस्था करावी· आश्रमशाळांमध्ये हे पाणी साठविण्यासाठी मोठया टाक्यांची व्यवस्था करावी· तसेच शाळेच्या परिसरात विहिरी खणल्यास त्या काळजीपूर्वक जाळी टाकून बंद कराव्यात·

7. आश्रमशाळा मुख्याध्यापक व अधीक्षकांना व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणाचा विषय 250 ते 400 विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळेचे व्यवस्थापन, आहार नियंत्रण, वस्तुवाटप, जमाखर्च व ताळेबंद वह्या लिहिणे यासारखे असावेत.

8. आदिवासी आश्रमशाळांतील स्वयंपाकघरे अतिशय अस्वच्छ आढळली. स्वयंपाकी व कामाठी वर्ग आरोग्य स्वच्छता, पौष्टीक आहार या सर्व बाबी अज्ञानापोटी धाब्यावर बसविताना आढळला. विद्यार्थ्यांच्या रोजच्या जेवणात काही ठराविक पदार्थ व ठराविक भाज्यांचा समावेश आढळला. यासाठी आश्रमशाळातील स्वयंपाकी, कामाठी वर्गाला आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या फंडातून "फूड क्राफट ॲण्ड टेक्नॉलॉजि" संस्थेचे प्रशिक्षण देण्यात यावे.

9. सर्व आश्रमशाळांना विद्युतपुरवठा केला असला तरी प्रत्यक्षात तिथे कमी वॅटसचे बल्ब व तेही मर्यादित ठिकाणी आढळतात. त्यासाठी आश्रमशाळांतील सर्व खोल्या, वर्ग व हॉलमध्ये भरपूर विद्युतप्रकाशाची व्यवस्था होईल असे मोठे दिवे, ट्यूब जास्त प्रमाणात वापरले जावेत. शाळेच्या परिसरात व मैदानावर हॅलोजन लॅम्पसूची व्यवस्था करावी.

10. मुलींच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने निदान रात्रीसाठी महिला वॉचमनची व्यवस्था करावी.

11. आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम यावर विशेष भर देण्यात यावा. आश्रमशाळेत वर्षातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

12. आश्रमशाळेतील प्राथमिक विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी व गळतीचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी विशेष परिश्रम घेण्यात यावेत. इ.1 ली ते चौथीपर्यंत महिला शिक्षिकांचे प्रमाण जास्त असावे. कारण बालमानसशास्त्राप्रमाणे या वयातील मुले स्त्री शिक्षिकेमध्ये आईचा आधार शोधून ( Mother figure ) त्यांच्याकडे जास्त मोकळेपणाने आपल्या भावना व अडचणी प्रकट करू शकतात.

13. आदिवासी विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लावण्यासाठी विशेष परिश्रम घेण्याची गरज आहे. बालवाडी ते तिसरीपर्यंतचा अभ्यासक्रम, गाणी, गोष्टी, कथा, नाटय यांच्या सहाय्याने शिकविण्यात यावा. त्यापुढेही **आदिवासी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे खच्चीकरण होणार नाही याची काळजी घेऊन त्यांना सोप्या पध्दतीने अभ्यासक्रम शिकविण्याची गरज आहे.** दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कोचिंग देण्यात यावे. तसेच परीक्षेच्या आधी महिनाभर सर्व विषयाच्या आधीच्या तीन वर्षाच्या प्रश्नपत्रिका सोडवून घेऊन त्या तपासून त्याप्रमाणे मार्गदर्शन

करण्याचा प्रयत्न केला जावा·

14· आदिवासी विद्यार्थ्यांमधील दहावी परीक्षेत प्रकल्पक्षेत्रात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास आदिवासी विभागाच्या संबंधित आयुक्तांनी बक्षिस द्यावे· त्यामुळे प्रथम येणा-या विद्यार्थ्याचे आदिवासी विकास विभागाकडून कौतुक तर होईलच शिवाय इतर विद्यार्थीही हे बक्षिस मिळविण्यासाठी प्रेरित होऊन अभ्यासात जास्त लक्ष घालतील·

15 शासकीय आश्रमशाळातील शिक्षकांना विषयानुसार "विषय उत्कृष्ट शिकविणे" या निकषानुसार बक्षिसे देण्यात यावी·

16· आश्रमशाळांच्या किरकोळ दुरुस्तीकडेदेखील प्राधान्याने लक्ष दयावे· तसेच पोस्टबेसिक आश्रमशाळांसाठी प्रयोगशाळा व ग्रंथालय अदययावत करण्यासाठी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली साहित्य पुरवावे· शिवाय सर्व आश्रमशाळाना ग्रंथालयासाठी पुस्तके, प्रयोगशाळेचे साहित्य, क्रीडा साहित्य घेण्यासाठी दर सहा महिन्यांनी 250/- रु·खर्च करण्यास परवानगी देण्यात यावी· या वस्तु खरेदी केल्याची वस्तु व पावतीसह पाहणी करुन खातरजमा करण्यात यावी· यापेक्षा जास्त किंमतीची संदर्भपुस्तके अथवा इतर साहित्य खरेदी करावयाचे असल्यास प्रकल्प अधिका-यांकडे यादी पाठवून वस्तू मागविण्याची तरतूद करण्यात यावी·

महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक व पोस्ट बेसिक आश्रमशाळेतील कामाचा सखोल अभ्यास.

## प्रपत्र क्रमांक १

### चौक-१ : आश्रमशाळेची सर्वसाधारण माहिती

१. आश्रमशाळेचे नांव व पूर्ण पत्ता :

२. आश्रमशाळा प्राथमिक आहे की पोस्ट बेसिक : प्राथमिक / पोस्ट बेसिक

३. आश्रमशाळा स्थापन झाल्याचे वर्ष:

४. आश्रमशाळेला जोडून बालवाडी चालविली जाते काय ? : होय / नाही

५. आश्रमशाळेत कितवीपर्यंत वर्ग भरतात:

६. आश्रमशाळेतील सन १९९२-९३ ची जमातीनिहाय विद्यार्थी संख्या. :

| अ.क्र. | आदिवासी | | इतर विद्यार्थी | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| | जमातीचे नांव | विद्यार्थीसंख्या | | |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |

९. पालकांचे सहकार्य कशाप्रकारे मिळते ? : अत्यल्प / पुरेसे / समाधानकारक

## चौक-२ : आश्रमशाळेची इमारत व वसतिगृहाबाबत

| | | |
|---|---|---|
| १. | आश्रमशाळेला स्वत:ची जमीन आहे काय ? असल्यास किती. | : होय / नाही |
| २. | आश्रमशाळा गावांपासून किती अंतरावर आहे ? | : |
| ३. | आश्रमशाळेच्या इमारतीचा तपशील. | : क्षेत्रफळ :<br>एकूण खोल्या :<br>कच्ची/पक्की : |
| ४. | आश्रमशाळेची इमारत शासनाच्या मालकीची आहे कां भाडयाची आहे. | : मालकीची / भाडयाची |
| ५. | इमारत भाडयाची असल्यास वार्षिक भाडे किती ?<br>भाडे प्रमाणित केले आहे काय ? | :<br><br>: होय / नाही |
| ६. | आश्रमशाळेची इमारत विद्यार्थ्यां-साठी पुरेशी आहे काय ? | : होय / नाही |
| ७. | अपुरी असल्यास किती विद्यार्थ्यांना पुरते. | : |
| ८. | पुरेशी नसल्यास आणखी किती जागा आवश्यक आहे. | : खोल्या / क्षेत्रफळ |
| ९. | आश्रमशाळेत शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली आहे काय ? | : होय / नाही |
| १०. | आश्रमशाळेतील शिक्षकांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उपलब्ध आहेत काय ? | : होय / नाही |
| ११. | आश्रमशाळेच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश देताना कोणते निकष लावले जातात. | : १]<br>२]<br>३]<br>४] |
| १२. | आश्रमशाळा व वसतिगृहाच्या इमारती एकाच ठिकाणी आहेत की वेगवेगळ्या ठिकाणी. | : |

१३. वसतिगृह इमारत वेगवेगळया ठिकाणी :
असल्यास त्याची मालकी, क्षेत्र व
भाडे इ. बाबत तपशील दयावा.

१४. वसतिगृहामध्ये स्वयंपाकासाठी, :
जेवणासाठी व धान्य साठविण्या-
साठी स्वतंत्र व्यवस्था आहे काय ?
असल्यास किती खोल्या आहेत ?

१५. नसल्यास प्रचलित व्यवस्था काय आहे? :

१६. आश्रमशाळेच्या वसतिगृहात किती :
विद्यार्थ्यांची क्षमता आहे ?
प्रत्यक्षात किती विद्यार्थी तेथे :
राहतात ?
त्यासाठी ती जागा पुरेशी आहे :
काय ?

१७. वसतिगृहात स्वच्छतागृह, स्नानगृह इ. :
व्यवस्था आहे काय ?

१८. असल्यास त्याचा तपशील दयावा :

१९. नसल्यास याबाबतची प्रचलित कोणती :
पध्दती अवलंबिली जाते ?

## चौक-३ : आश्रमशाळेती विद्यार्थी व शिक्षकांबाबत

१. आश्रमशाळेला पुरेसे विद्यार्थी : होय / नाही
मिळतात काय ?

अ] प्रत्येक वर्गातील मुलांची संख्या :
मान्यतेनुसार भरते काय ?

२. आश्रमशाळेती शिक्षकांची पदे : मंजूर / भारलेली / रिक्त

३. इंग्रजी, गणित व शास्त्र या : १]
विषयांच्या शिक्षकांची पदे रिक्त २]
असल्यास त्याची कारणे. ३]

४. इतर विषयांच्या शिक्षकांची रिक्त : १]
पदे न भरण्याची कारणे. २]
३]

५. आश्रमशाळेतील शिक्षकांची माहिती :
[टिप इ. बाबत स्वतंत्र तक्ता जोडावा]

| क्र. | नांव | अनुसूचित जाती<br>अनु. जमाती<br>इतर | शिक्षण | प्रशिक्षित | शिकविण्याचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

६. आश्रमशाळेत पास झालेल्या विद्यार्थ्यांची :
इयत्तावार गेल्या तीन वर्षातील आकडेवारी.

| वर्ग | विद्यार्थी संख्या | पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १९८९-९० | १९९०-९१ | १९९१-९२ |
|---|---|---|---|---|
| १ ली | | | | |
| २ री | | | | |
| ३ री | | | | |
| ४ थी | | | | |
| ५ वी | | | | |
| ६ वी | | | | |
| ७ वी | | | | |
| ८ वी | | | | |
| ९ वी | | | | |
| १० वी | | | | |

७. शैक्षणिक गुणवत्तो व्यतिरिक्त मुलांच्या व्यक्तीमत्वाची जोपासना करण्यासाठी गायन, वादन, चित्रकला, मैदानी स्पर्धा, पोहणे, नेमबाजी इ. कलागुणांची जोपासना करणाऱ्या स्पर्धा आयोजित केल्या जातात कां ? :

८. परिक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांत बक्षिसे दिली जातात काय ? असल्यास कोणत्या स्वरूपात. : होय / नाही

९. मैदानी स्पर्धा व अन्य कलागुणां-च्यात विशेष प्राविण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षिसे दिली जातात काय ? असल्यास कोणत्या स्वरूपात. : होय / नाही

१०. प्राथमिक व माध्यमिक आश्रम-शाळेतील विद्यार्थ्यांचे गळतीचे सर्वसाधारण शेकडा प्रमाण किती. : प्राथमिक शाळा/माध्यमिक शाळा

११. विद्यार्थ्यांच्या गळतीची प्रमुख कारणे कोणती ? : १]
२]
३]

१२. विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी आश्रमशाळे-मार्फत कोणते उपाय योजले जातात. : १]
२]
३]
४]

[अनुदान मिळत असल्यास ही माहिती द्यावी]

चौक-४ : मिळणाऱ्या अनुदानाबाबत व होणाऱ्या खर्चाबाबत

१. आश्रमशाळेला शासनाव्यतिरिक्त अन्य कोणाकडून अनुदान मिळते कां ? मिळत असल्यास तपशिलवार माहिती. :

२. शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरूप [जरून भासल्यास वेगळा तक्ता जोडा]. :

३. अनुदान वेळेवर मिळते काय ? : होय / नाही

४. अनुदान पुरेसे आहे काय ? नसल्यास किती हवे. : होय / नाही

५. मिळणारे अनुदान व आश्रमशाळेचा एकूण खर्च याचा तक्ता सादर करा. : मिळणारे पैसे बाबी खर्च

६. वसतिगृहातील आजारी विद्यार्थ्यांसाठी खर्चाची स्वतंत्र तरतूद आहे काय ? : होय / नाही

७. दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यावर शाळा सरासरी किती खर्च करते ? : सांगे

८. खर्चाच्या मुख्य बाबी कोणत्या ?

८. आश्रमशाळेचा गेल्या वर्षीचा एकूण खर्च. :

९. शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाबाबत: आश्रमशाळा मुख्याध्यापक व अधीक्षक यांनी सविस्तर मते द्यावीत.

## विभाग–५ : आश्रमशाळेतील सुविधा व इतर सोयी

१. आश्रमशाळेच्या ठिकाणी बारमाही पिण्याचे पाणी, दळणवळणाची सोय, दवाखाने, लाईट, दुकाने इ. पैकी कोणत्या मूलभूत सोयी उपलब्ध आहेत ? नसल्यास कोणती व्यवस्था केली जाते ? :

२. आश्रमशाळेत पुरेसे शैक्षणिक साहित्य उदा. फळे, नकाशे, पुस्तके, प्रयोग साहित्य, नकाशे उपलब्ध आहे काय ? : होय / नाही

३. नसल्यास त्याची कारणे : १]
२]
३]

४. शैक्षणिक साहित्याची उणीव :
कशी भरून काढली जाते ?

५. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची : होय / नाही
शारीरिक तपासणी नियमितपणे
केली जाते काय ?
असल्यास वर्षातून किती वेळा ?

६. शारीरिक तपासणी वेळेवर होत : १]
नसल्यास त्याची कारणे कोणती ? २]
३]
४]

७. आश्रमशाळेत पुस्तकी शिक्षणा- : होय / नाही
खेरीज इतर विषयाची शिक्षण
दिले जाते काय ?
असल्यास कोणत्या विषयाचे ?

८. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना :
खेळण्यासाठी क्रिडांगण व खेळाचे
पुरेसे साहित्य उपलब्ध आहे काय ?

९. नसल्यास त्याची कारणे कोणती ?

## चौक-६ : अध्यापन व परीक्षा पध्दती

१. दैनंदिन अध्यापनात कोणती :
अध्यापन पध्दती वापरता ?
उदा: व्याख्यान पध्दती, प्रश्नोत्तर
पध्दती, चर्चा पध्दती इ.

२. वरीलपैकी कोणती अध्यापन :
पध्दती परिणामकारक वाटते ?
का ?

३. अध्यापन करताना स्पष्टीकरणा- : होय / नाही
साठी बोलीभाषांचा उपयोग
करता काय ?

४. त्याचा कोणता परिणाम दिसून :
येतो ? कसा ?

५. अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यां-: रोज / नाही
साठी जास्तीचे वर्ग घेतले
जातात काय ?

६. कोणत्या विषयासाठी जास्तीचे :
वर्ग घेतले जातात ?

७. त्याचा कोणता परिणाम दिसून :
येतो ?

८. अध्यापन दर्जेदार होण्यासाठी :
आश्रमशाळेत इतर कोणते उपक्रम
राबविले जातात ?

९. तुम्हाला परीक्षा पद्धतीत : १]
जाणवणाऱ्या उणीवा कोणत्या ? २]
३]

१०. त्या कशाप्रकारे दूर करता ? : १]
२]
३]

११. त्याचा परिणाम काय आढळतो ? :

घटक-७ : आश्रमशाळेच्या अडचणी व सूचना

१. आश्रमशाळेच्या शैक्षणिक व इतर :
अडचणी शासनाकडून त्वरित
सोडविल्या जातात कां ?

२. नसल्यास तुम्ही त्या कशाप्रकारे :
सोडविता.

३. चांगल्या कामाबद्दल शिक्षकांना :
शासनाकडून पारितोषिक बक्षीस/
बढती/आगाऊ वाढ यापैकी काय
दिले जाते.

४. आपले निरीक्षण अधिकारी शाळेत भेट देऊन मार्गदर्शन करतात काय ? : होय / नाही

५. करीत असल्यास कशाप्रकारे ? :

६. आश्रमशाळेची तपासणी वेळेवर होते काय ? : होय / नाही

७. कोणामार्फत होते ?

८. गेल्या वर्षात किती तपासण्या झाल्या ? त्यातील महत्वाचे शेरे कोणते ? :

९. आश्रमशाळेच्या प्रमुख अडचणी कोणत्या ? :

१०. आश्रमशाळा चांगल्या चालाव्यात यासाठी आपणास कोणत्या सूचना कराव्या असे वाटते ? :

११. आश्रमशाळा जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबतचे आपले अभिप्राय. :

१२. मुख्याध्यापकास असलेले संस्थेचे अधिकार पुरेसे आहेत कां ? नसल्यास कोणत्या प्रकारचे अधिकार असणे जरुरीचे वाटते व त्याची कारणे . :

माहिती देणा-याची सही व हुद्दा
[मुख्याध्यापक]

दिनांक :

ठिकाण :

सी/-